## निशाणी क्र. ३० वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता क्रम ३९ नियम २ प्रमाणे दाखल केलेला आहे. या अर्जात वादीने विनंती केली आहे की, निशाणी ५ ची चौकशी होईपर्यंत दावा मिळकतीत कोणाही त्रयस्थ व्यक्तीचा हक्क, हितसंबंध निर्माण करु नये असा जैसे थे चा हुकूम प्रतिवादी विरूध्द देण्यात यावा. प्रस्तुतचा खरेदीखत होऊन मिळणेसाठी, ठराव व मनाई हुकुमाकरिता दाखल करण्यात आला असून वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. आर. नलांगे यांनी जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश पारीत करण्याची विनंती केली.

२. वादीचे अर्जातील कथन की, वादी यांनी प्रतिवादींविरुद्ध साठेखताच्या आधारे खरेदीखत करून मिळावे म्हणून दावा दाखल केला आहे. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी क्र. १ यांनी दि. ०३/०३/२०२५ रोजी दस्त नं. ८५६/२०२५ अन्वये दाव्यातील मालमत्ता गणेश शिवाजी बुधवंत यांना रु. १,१५,०००/- ला विकली असून त्या व्यवहाराची नोंद होऊ नये म्हणून वादी यांनी तहसीलदार, पाथर्डी यांचेकडे तक्रार अर्ज दिला आहे. खरेदीदाराकडून मालमत्तेचे पुढील हस्तांतरण किंवा बोजा निर्माण होण्याची शक्यता असल्याने आणि त्यामुळे वादीस अपूरणीय नुकसान व दाव्यात गुंतागुंत निर्माण होऊ शकते, म्हणून नि.नं. ५ ची चौकशी पूर्ण होईपर्यंत दाव्यातील मालमत्तेबाबत प्रतिवादींना कोणतेही हस्तांतरण न करण्याचा स्टेटस को आदेश देण्याची विनंती करण्यात आली आहे.

३. प्रतिवादी क्र. १ तर्फे विधिज्ञ श्री. एन. ए. वायभासे यांनी खुलासा दिला की, सदरील अर्ज कायदेशीर नाही. सदर अर्जातील संपुर्ण मजकुर खोटा व लबाडीचा आहे. प्रतिवादी क्र. १ यांनी दावा मिळकत विक्री केल्याचे वादी यांनी मागील तारखेस मे. कोर्टात दाखल केलेल्या खरेदीखत दस्त क्र. ८५६/२०२५ चे नक्कलेवरून दिसुन येते. त्यामुळे वादींना प्रतिवादी क्र. १ विरूध्द पुन्हा नव्याने मनाई हुकुम मागण्याचा कायदेशीर अधिकर नाही. त्यामुळे सदरचा अर्ज या स्टेजला टेनेबल नाही. सबब, वादींचा अर्ज नामंजुर करण्या यावा.

४. पुरेशी संधी देऊन देखील प्रतिवादी क्र. २ ते ५ यांनी प्रस्तुत अर्जावर खुलासा दिला नाही. त्यामुळे प्रतिवादी क्र. २ ते ५ तर्फे खुलासाविना मी प्रस्तुतचा आदेश पारीत करीत आहे.

५. वादीतर्फे विधिज्ञ श्री. एस. आर. नलांगे यांचा युक्तीवाद ऐकला. त्यांचे न्यायालयास सांगणे की, वादीचा दावा संयुक्त व अविभक्त कुटुंबीय मालमत्तेच्या वाटपासाठी असून दावा मिळकतीमध्ये वादींचा प्रथमदर्शनी हिस्सा असल्याचे दिसून येते. दावा प्रलंबित असताना प्रतिवादी दावा मिळकतीची विक्री किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करण्याचा प्रयत्न करीत असल्याचा वादीचा आरोप आहे. अशा हस्तांतरणामुळे तृतीय पक्षाचे हक्क निर्माण होऊन वादीच्या हक्कांवर परिणाम होण्याची

तसेच त्याचे अपरिमित नुकसान होण्याची शक्यता आहे. याउलट, मालमत्तेची विद्यमान स्थिती कायम ठेवण्याचा आदेश दिल्यास प्रतिवादींना कोणतीही विशेष हानी होणार नाही. त्यामुळे अंतिम निर्णय होईपर्यंत दावा मिळकतीबाबत जैसे थे (status quo) स्थिती कायम ठेवण्याचा अंतरिम आदेश देणे आवश्यक व न्यायोचित आहे.

६. वारंवार पुकारा करून देखील प्रतिवादीचे विधिज्ञ युक्तिवादाकरिता हजर झाले नाही. त्यामुळे प्रतिवादींतर्फे युक्तिवादाविना मी प्रस्तुतचा आदेश पारीत करीत आहे.

७. दावा, त्यासोबत जोडलेले दस्तऐवज, मनाई हुकूमाचा अर्ज तसेच वादीतर्फे करण्यात आलेला जैसे थे (status quo) स्थिती कायम ठेवण्याचा अर्ज विचारात घेतला. प्रस्तुतचा दावा खरेदीखत होऊन मिळणेसाठी, ठराव व मनाई हुकुमा करिता दाखल करण्यात आला आहे. प्रतिवादींविरुध्द जैसे थे (status quo) हुकूमाचा आदेश मिळण्याकरिता वादीने मा. न्यायालयाच्या हे निदर्शनास आणून देणे आवश्यक आहे की, सदरचा आदेश वादीच्या लाभात न दिल्यास दावा चालविण्याचा उद्देश नष्ट होण्याची शक्यता आहे. प्रस्तुत दाव्यात प्रतिवादी क्र. ५ हे त्रयस्थ व्यक्तीचा या दावा मिळकतीत हक्क निर्माण करु शकतो अशी भिती वादीस वाटत आहे.

८. त्याचप्रमाणे वादीस मालमत्ता हस्तांतर कायदा कलम ५२ प्रमाणे संरक्षण असले तरी प्रस्तुत दावा दाखल केल्यापासूनच्या तारखेनंतर दावा मिळकतीसंदर्भात त्रयस्थ व्यक्तीचे हक्क निर्माण केल्यास त्या व्यक्तीवर या दाव्याचा हुकूमनामा बंधनकारक असणार आहे. तरी देखील अशा प्रकारे हक्क निर्माण झाल्यास दाव्यातील गुंतागुंत वाढण्याची शक्यता आहे. प्रस्तुत दावा दाखल केल्यापासूनच्या तारखेनंतर प्रतिवादी क्र. १ याने दावा मिळकतीसंदर्भात प्रतिवादी क्र. ५ च्या लाभात खरेदीखत केल्याचे अभिलेखावरून दिसुन येते. त्यामुळे वादीतर्फे मागणी केल्याप्रमाणे एकतर्फा जैसे थे परिस्थिती ठेवण्याचा आदेश देण्याची आवश्यकता मला वाटत आहे. दावा मिळकत आज रोजी प्रतिवादी क्र. ५ यांच्या नावे करण्यात आली आहे, त्यामुळे दावा मिळकतीसंदर्भात पुन्हा त्रयस्थ व्यक्तीचा हक्क निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. म्हणून वरील सर्व कारणांकरिता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे -

## <u>आदेश</u>

पुढील तारखेपर्यंत अथवा जोपर्यंत सदरचा आदेश वाढविण्यात येईल तोपर्यंत दावा मिळकतीसंदर्भात प्रतिवादी क्र. ५ यांनी त्रयस्थ व्यक्तीचा हक्क, हितसंबंध निर्माण न करता दावा मिळकतीची जैसे थे (status quo) परिस्थिती ठेवावी.




Digitally signed by DHONDAGE VISHAL SHRAVAN
Date: 2026.07.16 16:52:25 +0530

ठिकाण : पाथर्डी (विशाल श्रावण धोंडगे)
दि. १६/०७/२०२६ २ रे सहदिवाणी न्यायाधीश क. स्तर